## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः प्रणय दत्ताराम गुरव

वयः २६ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणार – निगुडवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांच्यामार्फत :**

१. घटना दि.२७.०५.२०१७ रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास कोलाड स्टेशनच्या पुढे असलेल्या पुलावर घडली होती. मी माझ्या गावावरुन मुंबईला जाण्यासाठी सावंतवाडी–दिवा पॅसेंजर ट्रेनने जात होतो. ती ट्रेन ६.३० वाजता कोलाड रेल्वे स्टेशनला आली. त्यावेळी ती घटना घडली. पाच मिनीटात ट्रेन चालू झाल्यानंतर पुलावरील दोन इसमांनी मला काठीने फटका मारला. काठीने माझ्या हातावर फटका मारला व माझे डोक्याला मुकामार लागला. काठीने हातावर मारल्यामुळे माझ्या हातातील मोबाईल खाली पडला. मोबाईल खाली पडल्यानंतर ज्यांनी काठी मारली ते इसम मोबाईल घेवुन पळून गेले. माझा मोबाईल गोल्डर रंगाचा रेडमी नोट ४ होता. त्याची अंदाजे किंमत र.रु. १० हजार होती. त्यात एक जिओ व एक वोडाफोन कंपनीचे असे दोन सिमकार्ड होते. मी मुंबई चेंबुर येथे माझे घरी गेल्यानंतर जवळच्या दवाखान्यात जावुन उपचार

घेतले. दुस–या दिवशी पनवेलला जावुन रेल्वे पोलीस ठाणे येथे मी तक्रार नोंदविली. आता मला दाखवलेली तक्रार तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे.

२. त्यानंतर मला कोलाड पोलीस ठाण्यातुन फोन आला व त्यांनी मला दि.०२.०७.२०१७ रोजी पोलीस ठाण्यात बोलावले. तेथे मला पोलीसांनी त्या दोन इसमांचे वर्णन विचारले. ते दोन्ही इसम पाच ते सवापाच फुट उंचिचे होते. ते दोघे १९ ते २० वर्षे वयाच्या दरम्यान होते. त्या दोघांपैकी एक दिसायला गोरा होता, ते दोघे अंगाने बारिक होते. अशा प्रकारचे वर्णन मी पोलीसांना त्यावेळी सांगितले. पोलीसांनी माझा तसा पुरवणी जबाब लिहुन घेतला व माझी सही घेतली.

३. त्यानंतर त्या दोघांपैकी एक इसम पोलीसांना सापडला व त्याला ओळखण्यासाठी पोलीसांनी मला दि.२८.०७.२०१७ रोजी बोलावले. तेथे गेल्यानंतर तो इसम व माझा मोबाईल पोलीसांनी मला दाखवला. तो मोबाईल माझाच होता व त्या इसमाकडे सापडला होता. त्या सापडलेल्या इसमाचे नाव राजेश कापरे असल्याचे पोलीसांनी मला सांगितले. तो इसम तसाच दिसत होता. मी त्याला ओळखले. दुसरा इसम सापडला नाही. पोलीसांनी त्या अनुषंगाने पुन्हा माझा जबाब नोंदवला होता.

४. त्यानंतर दि.१४.०८.२०१७ रोजी पोलीसांनी मला पुन्हा पोलीस ठाण्यात बोलावले होते. तो दुसरा इसम सापडला होता. त्याच्या अनुषंगाने देखील पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी त्या दोघांना पाहिल्यास आता ओळखु शकत नाही कारण आता त्याला ८–९ वर्षे झाली. आता न्यायालयातील

आरोपीच्या पिंज–यात बसलेला व्यक्ती त्या इसमासारखा आहे. तो राजेश कापरे सारखा दिसत आहे. (आरोपी न्यायकक्षात आरोपीच्या पिंज–यात बसला आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. देशमुख यांचे मार्फत**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या रेल्वेने येत होतो त्या गाडीत गर्दी असते. मी इंजीनच्या मागे आठव्या डब्यात बसलो होतो. मी दरवाज्यात बसलो होतो. दोन इसमांपैकी मला कोणत्या व्यक्तीने काठीने मारले हे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले नव्हते. मला कोलाड पोलीस ठाणे येथे जेव्हा बोलावले व मी जेव्हा मोबाईल व त्या इसमास ओळखले त्यावेळी पोलीस ठाण्यात इतर अन्य लोक हजर नव्हते. पोलीसांनी आरोपीचे वर्णन मला विचारले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोन इसमांपैकी एकाने फटका मारताना मी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला मला पोलीसांनी दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, तो इसम म्हणजे हाच आरोपी आहे असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. त्यावेळी तेथे कोण कोण पोलीस होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा तोच इसम होता असे मी पोलीसांच्या सांगण्यावरुन सांगत आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी ट्रेनमधून जात असताना त्या दोन इसमांनी माझे हातावर फटका मारला, त्यामुळे माझे हाताला व डोक्याला मुका मार लागला व माझे हातातील मोबाईल खाली पडला, त्यानंतर मी पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार दिली तसेच कोलाड पोलीस ठाणे येथे जावून आरोपी व मोबाईल ओळखला असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

नि.क्र. ३७ (4) नि.फौ.ख.क्र.६४/२०१७

शासन वि. राजेश कापरे

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.11.27 14:59:01 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)

दि. २१.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.